ठाणे पोलीस आयुक्तालय

महाराष्ट्र शासन
(गृह विभाग)
पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ यांचे कार्यालय
कल्याण प. -४२१३०१

Email ID: cp.thane.dcpzone3@mahapolice.gov.in

दूरध्वनी क:०२५१/२३१३४१३

प्रेस नोट दि. २५/०८/२०२५

परिमंडळ - ३ कल्याण पोलीसांनी आंतर-राज्य ''गांजा'' तस्करीची साखळी उघडकीस आणुन कल्याण सह सोलापुर, विशाखापटणम (आंध्रप्रदेश) या ठिकाणांवरुन एकुण १३ आरोपीना ११५ किलो गांजा, पिस्टल, काडतुसे, वॉकी-टॉकी, मोटार कार, ॲटो रिक्षा, दुचाकी वाहने इत्यादी असे एकुण ७०,०३,०००/- रु. (सत्तर लाख तीन हजार रुपये) किंमतीचे मुददेमालासह जेरबंद केले.

कल्याण व डोंबिवली शहर परिसरात बेकायदेशीर अंमली पदार्थ विकी करणारे पेडलर यांचेवर कारवाई करणे करीता पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ - ३, कल्याण यांचे विशेष कारवाई पथकाने व खडकपाडा पोलीस ठाणे यांनी दि.०२/०८/२०२५ रोजी खडकपाडा पोलीस ठाणे हददीत आंबिवली रेल्वे स्टेशन फाटकाच्या पुढे बनेली रोड परिसरात ०३ आरोपीतांना त्यांचे ताब्यातुन ''गांजा'' हा अंमली पदार्थ व गुन्हा करण्यासाठी वापरलेले वाहन व रोख रक्कम हस्तगत करण्यात आली होती. सदर आरोपीतां विरुध्द खडकपाडा पोलीस ठाणे गु.र.नं. - ६३८/२०२५ अंमली पदार्थ विरोधी कायदा १९८५ चे कलम ८(क),२० (क), २९ व भारतीय हत्यार कायदा कलम ३, २५ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचा पोलीस पथकाने शिताफीने तपास करुन, सदर गुन्हयांचे धागे-दोरे हे कल्याण शहरा सोबतच बदलापुर, ठाणे, सह सोलापुर जिल्हा तसेच महाराष्ट्र राज्या बाहेरील विशाखापटट्णम राज्य आंध्रप्रदेश पर्यत पोहचलेले असल्याचे निष्पन्न करुन तसे पुरावे प्राप्त करुन, गुन्हयाचे तपासात प्राप्त पुरावे यांचे तात्रिंक विश्लेषण करुन तसेच माहितीचे आधारे पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ - ३, कल्याण यांचे मार्गदशनाखाली विविध तपास पथक ही बदलापुर, ठाणे, सोलापुर जिल्हा, विशाखापटट्णम राज्य आंध्रप्रदेश इत्यादी ठिकाणी पाठवुन पुढीलप्रमाणे नमुद आरोपीत यांना जेरबंद करुन त्यांचे ताब्यातील अंमली पदार्थ तसेच गुन्हा करण्यासाठी वापरलेले वाहने, मोबाईल, रोख रक्कम तसेच प्राणघातक अग्नीशस्त्रे तसेच जिवंत काडतुसे व वॉकीटॉकी असे पुढीलप्रमाणे साहीत्य हस्तगत करुन सदर आंतरराज्य अंमली पदार्थ टोळीवर ठोस व परिणामकारक कारवाई करुन त्यांचे समुळ उच्चाटन करण्यात आलेले आहे.

गुन्हयात हस्तगत करण्यात आलेला मुददेमाल :-

- ११५ (एकशे पंधरा किलो ग्रॅम) कि.ग्रॅम. रु २८,७५,०००/- किंमतीचा गांजा अंमली पदार्थ.
- गुन्हयाचे तपासा दरम्यान प्राणघातक अग्नीशस्त्र एक पिस्टल व ०२ जिवंत काडतुसे .
- गुन्हा करण्यासाठी वापरलेली ०२ वॉकीटॉकी संच चार्जर सह, ०२ मोटार कार, १ ॲटो रिक्षा, १ बुलेट, १ ॲक्टीव्हा व रोख रक्कम हस्तगत करण्यात आलेली आहे.

असा अंमली पदार्थ, अग्नीशस्त्र, वॉकीटॉकी संच, दुचाकी व मोटार वाहने व इतर साहीत्य असा सुमारे ७०,०३,०००/- रूपये (सत्तर लाख तीन हजार रूपये) किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आलेला आहे.

विशाखापट्टनम, आंध्रप्रदेश येथील जंगलपरिसरात ''गांजा'' या अंमली पदार्थाची वाहतुक करणेकरीता आरोपीत आपसात संपर्कात राहणेसाठी वॉकीटॉकी वापरत असल्याचे तपासात निष्पन्न झालेले असुन आंध्रप्रदेश राज्यात गेलेल्या तपास पथकाने शिताफीने सदर आरोपीतांकडे तपास करून वरीलप्रमाणे नमुद वॉकीटॉकी संच व बेकायदेशीर अग्नीशस्त्र जिवंत काडतुसासह हस्तगत करण्यात तपास पथकास यश प्राप्त झाले आहे.

<u>गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आरोपीतांची नावे :-</u>

१) बाबर उस्मान शेख, वय २७ वर्षे.
२) गुफरान हनान शेख, वय २९ वर्षे.
३) सुनिल मोहन राठोड, वय २५ वर्षे.
४) आह्याद अब्दुल शेख वय ५५ वर्षे.
५) रेश्मा अल्लापुददीन शेख वय ४४ वर्षे.
६) शुभम उर्फ सोन्या शरद भंडारी, वय २६ वर्षे.
७) सोनु हबीब सय्यद, वय २४ वर्षे.
८) आसिफ अहमद अब्दुल शेख, वय २५ वर्षे.
९) प्रथमेश हरीदास नलवडे, वय २३ वर्षे.
१०) रितेश पांडुरंग गायकवाड, वय २१ वर्षे.
११) अंबादास नवनाथ खामकर, वय २५ वर्षे.
१२) आकाश बाळु भिताडे ,वय २८ वर्षे.
१३) योगेश दत्तात्रय जोध, वय ३४ वर्षे.

यातील आरोपी क्र. ६, क्र.९ ते क्र.१३ असे एकुण ०६ आरोपी हे सद्या पोलीस कोठडी मध्ये आहे.

सदरची कामगिरी मा. पोलीस आयुक्त सो. श्री. आशितोष डुंबरे, मा. सह. पोलीस आयुक्त सो. श्री. ज्ञानेश्वर चव्हाण, मा. अपर पोलीस आयुक्त सो. पूर्व प्रादेशिक विभाग श्री. संजय जाधव, मा. पोलीस उप-आयुक्त सो. परिमंडळ - ०३, श्री. अतुल झेंडे, यांचे मार्गदर्शनाखाली तसेच मा. सहायक पोलीस आयुक्त सो. कल्याण विभाग, श्री. कल्याणजी घेटे, मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक सो. खडकपाडा पो. ठाणे, डॉ. अमरनाथ वाघमोडे यांचे देखरेखीखाली पो.नि. मारुती आंधळे (गुन्हे), पो.नि. साबाजी नाईक (प्रशा.) कोळसेवाडी पो. ठाणे, स.पो.नि. अनिल गायकवाड, स. पो.नि. विजय गायकवाड, स.पो.नि. संदिप भालेराव, पो.उप.निरी. जितेंद्र ठोके, पो.हवा. ३०९० सदाशिव देवरे, पो.हवा. ३५३३ राजु लोखंडे, पो.हवा. ५१८१ संदिप भोईर, पो.हवा. ४१३ योगेश बुधकर, पो.हवा. २०१२ निसार पिंजारी, पो.शि. ८०५९ सुरज खंडाळे, पो.शि. २९६४ अनिल खरसान, पो.शि. ७६५३ राहुल शिंदे, पो.शि. २३२३ अमित शिंदे, पो.शि. २८८९ खुशाल नेरकर, पो.शि. ४४९६ कांतीलाल वारघडे, पो.शि. ८३८१ अनंत देसले, पो.शि.८०५९ सुरेश खंडाळे यांनी केलेली आहे.



